उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
व विभागीय कृषि सहसंचालक यांना जलसंधारण योजनेच्या
उपप्रकल्पाकरीता प्रदान करण्यात आलेल्या तांत्रिक व
प्रशासकीय मंजूरी देण्याच्या अधिकारात वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. जलयो २००८/प्र.क्र.१८५/जल-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २१ एप्रिल, २००९.

वाचा :- शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग

१) क्र. जलयो १०९५/प्र.क्र.१२५/जल-७, दि.२० जानेवारी, १९९६.

२) क्र. जलसं २००८/प्र.क्र.१५९/जल-७, दि.२७ ऑक्टोबर, २००८.

शासन निर्णय नियोजन विभाग

३) क्र. रोहयो २००७/प्र.क्र.९५/रोहयो-१, दि.१६ जुलै, २००७.

४) क्र. मग्रारोहयो २००७/प्र.क्र.२४/रोहयो-१०, दि.२७ डिसेंबर, २००७.

प्रस्तावना :-

राज्यातील कोरडवाहू क्षेत्राची व्याप्ती व कोरडवाहू क्षेत्राचा सर्वांगिण विकास करण्याकरीता मृद व जलसंधारण कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता लक्षात घेऊन विविध कारणाने होणारी जमिनीची धूप थांबविणे, उगमापासून नदीपर्यंत विविध उपचाराद्वारे पाणलोटातील अपधावेचे नियंत्रण करुन भूगर्भातील पाणीसाठा वाढविणे, शेतीसाठी संरक्षित पाणी उपलब्ध करणे, जमिनीची उत्पादकता वाढवून कृषि उत्पादनामध्ये वाढ करणे व त्यात सातत्य राखणे, ग्रामपातळीवरील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत विविध उपचाराद्वारे बळकट करणे या प्रमुख उद्देशाने पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमामध्ये मृद व जलसंधारणाची कामे उदा.समपातळी मातीचे व जैविक बांध, ढाळीचे मातीचे व जैविक बांध, वळण बंधारे, मजगी, पेंडी बंदिस्त, शेततळी, पुनर्भरण चर, भूमिगत बंधारे, समपातळी सलग चर इ. घेण्यात येतात. पाणलोट कार्यक्रमात शाश्वतता आणण्यासाठी लोकसहभाग अनिवार्य करुन विविध उपचार पध्दतींचा अवलंब करण्यासाठी सन १९९६ पासून हा कार्यक्रम एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम या स्वरुपात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे ठळक वैशिष्ट म्हणजे गाव हा घटक मानून लोकसहभागाच्या माध्यमातून जलसंधारण व भूविकासाच्या कामाचे एकात्मिक नियोजन करुन कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

२. जलसंधारण कार्यक्रमासाठी विविध स्त्रोतांतर्गत उपलब्ध होणारा निधी वापरला जात असून प्रामुख्याने रोजगार हमी योजनेचा निधी मोठ्या प्रमाणावर वापरला जातो. पाणलोट क्षेत्राचे निरनिराळे उपप्रकल्प पाडले जातात. या उपप्रकल्पाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय तसेच तांत्रिक मंजूरी देण्याचे अधिकार वेळोवेळी क्षेत्रिय अधिका-यांना प्रदान करण्यात आले आहेत. रोजगार हमी योजनेतर्गत निरनिराळ्या कामांच्या बाबींसाठी अकुशल मजूरांना दयावयाच्या मजूरीच्या दरामध्ये वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे मृद व जलसंधारण कामांच्या कुशल कामासाठी लागणा-या साहित्याच्या तसेच मजूरीच्या दरामध्ये सुध्दा वाढ झालेली आहे. त्या अनुषंगाने नियोजन विभागाच्या संदर्भाधीन दि.१६ जुलै, २००७ च्या

शासन निर्ण ान्वये पाणलोट क्षेत्र आधारित जलसंधारण कार्यक्रमांतर्गत मृद व जलसंधारण कामांचे तांत्रिक व आर्थिक माप ड सुधारित

करण्यात आ े आहेत. मजूरीच्या दरात झालेली वाढ व त्या अनुषंगाने सुधारित करण्यात आलेले तांत्रिक व आर्थिक माप ड लक्षात घेता पाणलोट विकास कार्यक्रमाचे प्रति हेक्टरी आर्थिक मापदंड संदर्भाधीन दि.२७ ऑक्टोबर, २००८ च्या शासन निर्णयान्वये सुधारित करण्यात आले आहे. परिणामी पाणलोट क्षेत्र आधारित जलसंधारण ार्यक्रमाखालील विविध मृद व जलसंधारण कामांच्या अंदाजपत्रकांची रक्कम त्या प्रमाणात वाढली आहे.

३. उपरोक्त परिच्छेद २ मध्ये नमूद बाबींचा विचार करता उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृ ी अधिकारी तसेच विभागीय कृषि सहसंचालक यांना प्रदान करण्यात आलेल्या जलसंधारण योजनांच्या उपप्रकल्पांना तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी देण्याच्या वित्तीय अधिकारात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या ि चाराधीन होता.

शासन निण य :-

प्रस्तावनेत नमूद केलेल्या परिस्थितीचा साकल्याने विचार करुन विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हा अधी ्षक कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी यांना जलसंधारण योजनेच्या उपप्रकल्पांना तांत्रिक व प्र ासकीय मंजूरी देण्याच्या वित्तीय अधिकारात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मान्यता देण्यात येत ाहे. ही सुधारणा खाली नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

(रु.लक्ष)

| अ.क्र. | स्तर | सध्या अस्तित्वात असलेले तांत्रिक व प्रशासकीय मंजूरीचे अधिकार | आता मान्यता दिलेले तांत्रिक व प्रशासकीय मंजूरीचे सुधारित अधिकार |
|---|---|---|---|
| १ | उपविभागीय कृषि अधिकारी | ५.०० | १०.०० |
| २ | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | ७.५० | १५.०० |
| ३ | विभागीय कृषि सहसंचालक | -- | ३०.०० |

अटी :-

१) प्रकल्पां ी कामे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात तरतूद असल्याशिवाय करण्यात येवू नयेत.

२) प्रशासकी य मंजूरी देणा-या सक्षम अधिका-याने मान्यता दिलेल्या अंदाजित खर्चापेक्षा जास्तीच्या खर्चास मान्यता देऊ नये.

२. उपरोक्त प्रमाणे मंजूर करण्यात आलेले सुधारित अधिकार सर्व क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांच्या निद ानास आणून देण्याबाबत संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,पुणे यांनी दक्षता घ्यावी. संचा क, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी यांनी प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी दिलेल्या मृद व जलसंधारणाच्या उपप्रकल्पां ा कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकाची प्रत्येक वर्षी किती प्रमाणात तपासणी करावी याबाबत संचालक, मृ संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,पुणे यांनी सविस्तर आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

३. उपरोक्त नमूद करण्यात आलेले तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेचे अधिकार हे जलसंधारण कार्यक्रमांत ा राबविण्यात येणा-या मृद व जलसंधारणाच्या सर्व कामांसाठी लागू राहतील.

४. हा शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.५५/का-१४३२, दि.२४.२.२००९ व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.३६/०९/व्यय-१५, दि.६.३.२००९ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २००९०४२११७२३१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( रेखा भिडे )
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव,
मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग,
मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषद,
प्रमुख मार्गदर्शक, महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषद,
मा.कार्याध्यक्ष, आदर्श गाव संकल्प व प्रकल्प समिती,
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे
सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे,
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर) पुणे,
सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
सर्व उपविभागीय कृषि अधिकारी,
विशेष कार्य अधिकारी (मग्रारोहयो) नियोजन विभाग,
सहसचिव (रोहयो) नियोजन विभाग,
नियोजन विभाग / वित्त विभाग,
सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, जलसंधारण उपविभाग / निवडनस्ती जल-७ संग्रहार्थ.

H-0391-2